ग्रामीण रुग्णालय, मेढा, ता. जावळी, जि. सातारा येथील मुख्य इमारतीचे उर्वरित बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१५/ प्र.क्र.१२५/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: २० डिसेंबर, २०१७.

वाचा

१) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/कक्ष-३/टे-६/ग्रारुमेढाउर्व.काम/५३५५-५६/१५, दि.२७.०५.२०१५.

प्रस्तावना

संदर्भाधीन पत्रान्वये ग्रामीण रुग्णालय मेढा, ता. जावळी, जि.सातारा येथील मुख्य इमारतीचे उर्वरित बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता व अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. सदरच्या बांधकामाचे अंदाजपत्रक हे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांनी तयार केले असून ते सन २०१३-१४ च्या दरसूचिवर आधारित रु.३,००,६८,३६०/- इतक्या किंमतीचे आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

ग्रामीण रुग्णालय मेढा, ता. जावळी, जि.सातारा येथील मुख्य इमारतीचे उर्वरित बांधकामासह (४९८.६२ चौ.मि.) विद्युतीकरण, पाणीपुरवठा व मलनि:स्सारण, अंतर्गत रस्ते, फर्निचार, पार्कींग व्यवस्था, पथ दिवे, जनरेटर, पाणी पुरवठा इ. साठी तरतूद करण्यात आली आहे. सन २०१३-१४ च्या दरसूचिवर आधारित रु.३,००,६८,३६०/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकाची सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या छाननी अंती Recapitulation sheet मध्ये दर्शविण्यात आलेल्या रू.२७३.५२ लक्ष (अक्षरी रूपये दोन कोटी त्र्याहत्तर लक्ष बावन्न हजार मात्र) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

Name of Work : Construction of Rural Hospital (Part II) Building at Medha, Tal. Jawali, Dist. Satara			
Recapitulation Sheet			
Sr.No.	**Particulars of Items**	**Norms (Unit Rate Rs. per Sqmt./Lump Sum etc.)**	**Cost Rs.**
(A)	**ESSENTIAL ITEMS**		
1.	**Building proper (Scope)**		
	(a) Area of (sqmt) 498.62	25000 Per Sqmt.	1,24,65,500
	(b) Number of Floors GF		
	(c) Foundation in B.C. / Weak Soil		
	(d) Cost of Construction		**1,24,65,500**
2.	**Electrification** Internal	5 % of 1 (d)	6,23,275
	External	6 % of 1 (d)	7,47,930
		Total	**13,71,205**
3.	**Water Supply and Sanitation**	5 % of 1 (d)	**6,23,275**
4.	**Miscellaneous Items**		
	Internal Roads 855	4000 Per Rmt.	34,20,000
	C.D. Works 6	200000 Per No.	12,00,000
	Furniture 498.62	3000 Per Sqmt	14,95,860
	Cycle Stand, Garage etc.	Lump Sum	10,00,000
	Street Lights etc.	Lump Sum	11,00,000
	Generator	Lump Sum	10,00,000
	Water Main, Bore Well etc.	Lump Sum	3,00,000
		Total	**95,15,860**
	Sub Total (A) = (1)+(2)+(3)+(4)		**2,39,75,840**
	Sub Total (A)		**2,39,75,840**
(B)	**OPTIONAL ITEMS**		
Sr.	Items		
	Sub Total (B)		**0**
	PROJECT (A)+(B) (T)		**2,39,75,840**
	Add 4 % for GST on (d)		**4,98,620**
	Add 12 % for GST on (T)		**28,77,101**
	TOTAL COST OF PROJECT		**2,73,51,561**
	Say Rs. Lakhs		**273.52**

सदर कामावर होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्रमांक एच-८

“ ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

०२- ग्रामीण आरोग्य सेवा

२००- इतर कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना

(००)(०१)- प्रमुख बांधकामे (४२१० ०१४१)

५३- मोठी बांधकामे ”

अटी :-

१. काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.
२. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजुर करूनच काम हाती घ्यावे.
३. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनूसार कार्यवाही करण्यात यावी.
४. सदर कामाच्या बांधकामाचा खर्च सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.
५. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७.७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र.६४६/इमा-२, दि.२१.०८.२०१७ अन्वये दर्शविलेल्या व वित्त विभागाच्या शा.नि. क्र.विअप्र-१०००/ प्र.क्र.४६/०१/ विनियम, दि.११.०७.२००१ सोबतच्या परिशिष्टातील भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ नियम क्र.१३४ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१९१६०१०१२६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.12.20 12:39:30 +05'30'

(रो. दि. कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

३. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (आरोग्य संस्थांमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम), मुंबई

४. सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई.

५. उपसंचालक, आरोग्य सेवा (कोल्हापूर मंडळ), कोल्हापूर.

६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे प्रादेशिक विभाग.

७. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर.

८. जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा.

९. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.

१०.महालेखापाल, १/२महाराष्ट्र(लेखा व लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/ नागपूर.

११.वित्त विभाग (विनियम कार्यासन), मंत्रालय, मुंबई.

१२.सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई.

१३.अवर सचिव (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.

१४.निवडनस्ती(आरोग्य-४)